माहिती हवीय?

नितू यशवंत कोळी, अंतोरा पेण.

□ भारतीय चित्रपटातील पहिला संगीतकार कोण?

– फिरोज शहा मिस्त्री व बी. ईरानी. १९३१चा *आलमआरा* हा भारताचा पहिला बोलपट त्या दोघांनी संगीतबद्ध केला होता.

□ भारतीय चित्रपटातील नायक-नायिकेची पहिली जोडी कोणती?

– दाबके व साळुंखे. १९१३ चा *राजा हरिश्चंद्र* भारतात निर्माण झालेला पहिला मूकपट. दाबकेनी या चित्रपटात हरिश्चंद्राची भूमिका केली होती. त्या काळात स्त्रिया चित्रपटात भूमिका करीत नव्हत्या. यामुळे साळुंखेनी या चित्रपटात तारामतीची भूमिका केली होती.

गौतमी गणेश कोळी, वरेडी.

□ कुमकुम कोणत्या चित्रपटामुळे हिट झाली?

– गुरुदत्त यांच्या *आरपार* या चित्रपटामुळे.

सूरज विष्णू कोळी, वरेडी.

□ संजय दत्त व श्रीदेवी यांनी कोणत्या चित्रपटात एकत्र भूमिका केली?

– *गुमराह* या एकाच चित्रपटात.

ममता विष्णू कोळी, कोळीवाडा.

□ दादा कोंडकेनी भूमिका केलेला पहिला चित्रपट कोणता?

– *तांबडी माती*.

कृष्णा अंबाजी कोळी, वरेडी.

□ प्रीती झिंटाचा पहिला चित्रपट कोणता?

– *दिल से*.

□ खान घराण्यातील पहिला लोकप्रिय कलाकार कोण?.

– *आलमआरा* या पहिल्या भारतीय बोलपटात फकिराची भूमिका करणारा डब्ल्यू. एम. खान.

□ कपूर घराण्यातील पहिला कलाकार कोण?

– पृथ्वीराज कपूर.

□ जितेंद्र व जया भादुरी या जोडीचा पहिला चित्रपट कोणता?

– *परिचय*. या एका चित्रपटानंतर ते दोघे कोणत्याच चित्रपटात कधी एकत्र चमकले नाहीत.

मंगेश रामदास ठाकूर, गोविर्ले.

□ दिलीपकुमारचा पहिला चित्रपट कोणता

– *ज्वारभाटा*.

विष्णू कोळी, वरेडी कोळीवाडा.

□ देव आनंद व हेमामालिनी कोणकोणत्या चित्रपटात एकत्र चमकले?

– *जॉनी मेरा नाम, आमिर गरीब, तेरे मेरे सपने, जोशिला, छुपा रुस्तुम, शरीफ बदमाश, जानेमन*.

भरत चंद्रकांत कालुवाला, माहीम कॉजवे.

□ *कारवाँ* हा चित्रपट केव्हा प्रदर्शित झाला? कलाकार, गीतकार, संगीतकार, निर्माता-दिग्दर्शक कोण?

– *कारवाँ* १९७१ला प्रदर्शित झाला होता. जितेंद्र, आशा पारेख, मदनपुरी, हेलन, अरुणा ईराणी, रवींद्र कपूर, मेहमूद (ज्यू.), किशन मेहता, मनोरमा, अन्वर अली, संजाना शिवराज या चित्रपटातील प्रमुख कलाकार होते. गीतकार मजरुह, संगीतकार आर. डी. बर्मन, निर्माता ताहीर हुसेन, दिग्दर्शक नासिर हुसेन.

प्रतिभा प्रकाश कोळी, वरेडी कोळीवाडा.

□ अनू मलिकचा पहिला चित्रपट कोणता?

– *हंटरवाली ७७*.


मेहुल प्रताप, पापडी वसई.

□ पीस कंवलने कोणकोणत्या चित्रपटात नायिकेची भूमिका केली? नायक कोण?

– *दिले नादान* (तलत), *बाराती* (आगा), *किस्मत* (रंजन) या चित्रपटात पीस कंवल नायिकेच्या भूमिकेत चमकली. तिला नायिका म्हणून फारसं यश मिळालं नाही शेवटची पडद्यावर दिमली होती.

रविकांत रोहिदास साखरे, जामखेड.

□ पूनम धिल्लाँने आतापर्यंत कोणकोणत्या नायकांच्या बरोबर नायिकेची भूमिका केलीय?



कभी अजनबी थेमध्ये पूनम धिल्लाँ-संदीप पाटील

– सचिन (*त्रिशूल*), फारुश शेख (*नूरी*), जितेंद्र (*निशाना*), राजेश खन्ना (*रेड रोज*), रणधीर कपूर (*बीवी ओ बीवी*), राज किरण (*बसेरा*), मिथुन चक्रवर्ती (*मै और मेरा हाथी*), राज बब्बर (*पूनम*), शशी कपूर (*सवाल*), कुमार गौरव (*तेरी कसम*), अनिल कपूर (*लैला*), सनी देओल (*सोनी महिवाल*), नसीरुद्दीन शहा (*मालामाल*), संदीप पाटील (*कभी अजनबी थे*), ऋषी कपूर (*सितमगर*), जॅकी श्रॉफ (*शिवा का इन्साफ*), रजनीकांत (*जॉन जॉनी जनार्दन*).

आदिमाया शक्ती, तांडेल.

□ असरानीचा पहिला चित्रपट?

– *गुड्डी*.

महादू नामदेव माकर, हडपसर, पुणे.

□ लक्ष्मीकांत प्यारेलाल यांचा पहिला चित्रपट कोणता?

– १९६३ चा *पारसमणी*.

कृष्णा अंबाजी कोळी, वरेडी कोळीवाडा.

□ दादा कोंडकेचा शेवटचा चित्रपट कोणता?

– *वाजवू का?*

□ सुरेश ओबेरॉयचा पहिला चित्रपट कोणता?

– *एक बार फिर*.

□ राखीने कोणत्या चित्रपटात सर्वात प्रथम आईची भूमिका केली?

– *शक्ती*.

सोनुल लहु कोळी, वरेडी.

□ मराठी चित्रपटात नायक-नायिकेची भूमिका करणाऱ्या पती-पत्नीच्या कोणकोणत्या जोड्या आहेत?

– रमेश देव-सीमा, बाळ धुरी-जयश्री गडकर, सचिन-सुप्रिया, अविनाश नारकर ऐश्वर्या नारकर, दीपक देऊळकर-निशिगंधा वाड, अशोक सराफ, निवेदिता सराफ, लक्ष्मीकांत बेर्डे-प्रिया.

रेखा मारुती कोळी, पेण.

□ सनी देओल व बॉबी देओल यांचा पहिला चित्रपट कोणता?

– सनीचा पहिला चित्रपट *बेताब*. बॉबीचा पहिला चित्रपट *धरमवीर* या चित्रपटात त्याने बालकलाकार म्हणून छोट्या धर्मेंद्रची भूमिंका केली होती. त्याने नायकाची भूमिका केलेला पहिला चित्रपट *बरसात*.

पी. एस. म्हापसेकर, म्हापसा गोवा.

□ जॉय मुखर्जीने कोणकोणत्या चित्रपटात नायकाची भूमिका केली?

– *लव्ह इन सिमला, हम हिंदुस्तानी, एक मुसाफिर एक हसीना, फिर वही दिल लाया हूं, आवो प्यार करे, दूर की आवाज, इशारा, जी चाहता है, जिद्दी, लव्ह इन टोकिओ, सांज और आवाज, यह जिंदगी कितनी हसीन है, शागिर्द, दिल और मोहब्बत, एक कली मुस्काई, हम साया, आग और दाग, एहसान, इन्स्पेक्टर, मुजरिम, पुरस्कार, एक बार मुस्कुरा दो, लव इन बॉम्बे*.